# प्रेस नोट दिनांक ०१/०३/२०१९

**इन्शुरन्सचे १८ लाख रुपये रक्कम मिळावे या हव्यासाने गाडी मालकानेच टोयोटा इनोव्हा क्रिस्टा गाडी चोरीस गेल्याचा केला बनाव.**

हडपसर पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे व पोना/ विनोद शिवले यांना पेट्रोलिंग दरम्यान एका बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, काही दिवसांपुर्वी हडपसर भागातुन एक इनोव्हा क्रिस्टा गाडी क्र. एम एच १२ पी क्यु २९७५ हि चोरीस गेले बाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे वाहन चोरीचा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयातील गाडी हि चोरीस गेली नसुन ती फिर्यादीनेच इन्शुरन्सच्या पैश्यासाठी गाडी मध्येप्रदेश व महाराष्ट्राच्या सिमेलगत एका गावामध्ये लपवुन ठेवली होती सदर गाडी आता हडपसर मांजरी भागात फिरत असुन त्या गाडीस नंबर प्लेट लावलेली नाही.

सदर बातमीच्या अनुषंगाने पोलीस उप निरीक्षक भांगे व तपास पथकातील स्टाफ असे पेट्रोलिंग करीत असताना सोलापुर हायवेवर मांजरी फाटा येथे एक सिल्वर रंगाची टोयोटा इनोवा गाडी हि उभी असल्याची दिसली सदर गाडी संशयित असल्याचे दिसल्याने लागलीच पोलीसांनी सदर गाडीतील इसमास ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव १) किरण दत्तात्रेय जाधव, वय – २४ वर्षे, रा. पापडे वस्ती हडपसर मुळ रा. खामकर वाडी,उस्मानाबाद, वाशी, उस्मानाबाद असे असल्याचे सांगितले त्याचेकडे गाडीचे नंबर प्लेट गाडीचे कागदपत्रांबाबत चौकशी करता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यास हडपसर पोलीस स्टेशन येथे आणुन अधिक चौकशी करता किरण जाधव याने सांगितले की,

त्याने सदर गाडी हि टयुरिस्ट व्यवसायाकरीता विकत घेतली होती. परंतु फायनान्स चे हफ्ते भरणे शक्य नसल्याने त्याने त्याची इनोवा गाडी चोरीस गेल्याचा बनाव करुन इफको टोकीयो या इन्शुरन्स कंपनीकडुन गाडीचे इन्शुरन्सचे पैसे घ्यायचे व गाडी मध्यप्रदेशमध्ये विकुन त्याचे सुध्दा पैसे घ्यायचे असा बनाव रचला. सदर ठरलेल्या बनावानुसार फिर्यादीने दिनांक २५/०९/२०१८ रोजी त्याची इनोव्हा क्रिस्टा गाडी क्र. एम एच १२ पी क्यु २९७५ हि चोरीस गेल्याबाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. त्यानंतर त्यांनी सदर गाडी हि प्रथम अहमदनगर येथे काही दिवस लपवुन ठेवली त्यानंतर शिरपुर जि.धुळे येथे लपवुन ठेवली व सदर गाडी हि मध्य प्रदेश येथील एका इसमास विकण्याचे ठरले होते परंतु इन्शुरन्स कंपनीला आवश्यक असणारा पोलीसांचा अंतिम अहवाल प्राप्त न झाल्याने गाडीचा व्यवहार होवु शकला नाही. व त्याकरीता मी हडपसर मध्ये आलो होतो अशी माहीती किरण जाधव याने सांगितली.

इन्शुरन्सचे पैसे मिळविण्याचे हव्यासापोटी गाडी चोरीस गेल्याची खोटी तक्रार पोलीसांना देवुन पोलीसांची दिशाभुल केल्याने फिर्यादीकडुन सदर गुन्हयाचे पुराव्याकामी गाडी जप्त करुन खोटी तक्रार दिल्याबाबत फिर्यादीविरुध्द मा.लष्कर कोर्टात दोषारोप पाठविण्याची तजवीज ठेवली आहे.

सदर आरोपींकडुन हडपसर पोलीस स्टेशन तपास पथकाने गुन्हयातील इनोव्हा क्रिस्टा गाडी क्र. एम एच १२ पी क्यु २९७५ हि जप्त करुन १८,००,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला आहे.

सदर कामगिरी हि,सुनिल फुलारी मा.अपर पोलीस आयुक्त सो पुर्व विभाग, प्रकाश गायकवाड, मा.पोलीस उप आयुक्त सो परि.५, सुनिल देशमुख सपोआ हडपसर विभाग, सुनिल तांबे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सपोनि संजय चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोशि/ नितीन मुंढे, पोना/प्रताप गायकवाड, पोना/विनोद शिवले, पोशि/अकबर शेख, पोशि/शशिकांत नाळे, प्रमोद टिळेकर यांनी केली आहे.